नियमित फौ. ख. क्र.४/२०२०
सरकार -वि.- रेहमद हसन शेख
नि.क्र. २२.

## सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - शरद श्याम भस्मे,
वय ४० वर्षे, व्यवसाय – सहाय्यम पोलीस निरीक्षक,
राहणार – पोलीस स्टेशन वरोरा, ता.वरोरा, जि.चंद्रपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. मी फिर्यादीला ओळखतो. दिनांक २३.१०.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन, भिवापूर येथे सहाय्यम पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी पो.शि. श्रीचंद पवार यांनी पारवे पेट्रोल पंपजवळ एक ट्रक पकडला होता व त्याची मला त्यांनी माहिती दिली. त्यानंतर मी घटनास्थळी गेलो. तेथे मी दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला नि.क्र.१९ वरील समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर मी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.त्यास **नि.क्र.२३** देण्यात येते. त्यानंतर मी गुन्ह्यातील जप्त ३२ जनावरांना वैद्यकीय तपासणीकरिता भगीरथ गोरक्षण संस्था भंडारा येथे दाखल केले. तसे पत्र गोरंक्षण संस्थेला दिला. आता मला दाखविलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते. त्यानंतर गोरंक्षण संस्थेने जप्त जनावरांची वैद्यकीय तपासणी केली. त्यानंतर गुन्हा क्रमांक ५६६/२०१९ नोंद झाला होता. त्याचा तपास माझ्याकडे आला. तपासादरम्यान मी आरोपीला अटक केली. त्यानंतर मी प्रादेशीक परिवहन कार्यालय येथे वाहनाच्या तपासणीकरिता पत्र दिले. आता मला दाखविलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येते. त्यानंतर वाहणाचे कागदपत्र हस्तगत केले, साक्षीदारांचे बयान घेतले व तपासाअंती दोषारोप पत्र दाखल केले.

**नियमित फौ. ख. क्र.४/२०२०**
**सरकार -वि.- रेहमद हसन शेख**
**नि.क्र. २२.**

सरतपास संपला.

<u>**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी जप्त जनावरे गोरक्षण संस्थेकडे पाठविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी जनावरांची वैद्यकीय तपासणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आर.टी.ओ.ला पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयान त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
दिनांक १७.०१.२०२६ स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.